# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

दैनिक
एकमेव विचारपत्र
महाराष्ट्र न्यूज
February 23, 2026
Page no:3 | epaper.mahanewsnet.com वार - सोमवार

# शेती, उद्योग, आणि परिसरातील स्थानिक उत्पादनांचा भव्य संगम

: महाराष्ट्र न्यूज नेटवर्क

सातारा, दि. २२ फेब्रुवारी : पाटण येथे कोयना एज्युकेशन सोसायटी पाटण, बा. .कॉलेज, पाटण (आय. क्यू. ए. सी.) आणि रोटरी क्लब पाटण यांच्या संयुक्त विद्यमाने २८ फेब्रुवारी, १मार्च आणि २मार्च या दिवशी पाटण महोत्सव साजरा होत आहे.

या महोत्सवाच्या माध्यमातून शेतकरी, उद्योजक आणि सर्वसामान्य नागरिकांना शेती, उद्योग, नवउर्जा व स्थानिक उत्पादनांची प्रत्यक्ष माहिती मिळणार असून खरेदी-विक्रीसाठी एकाच ठिकाणी नवीन उद्योजकाना, विद्यार्थी यांना व्यापक व्यासपीठ उपलब्ध होणार असल्याची कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक याज्ञसेन पाटणकर आणि संजीव चव्हाण यांनी दिली.

यावेळी संयोजन समितीचे चेअरमन प्र. प्राचार्य डॉ. विलासराव कळंत्रे, समन्वयक डॉ. हेमलता काटे, सदस्य रो. जगदीश शेंडे, सचिव विजय काटे, सदस्य डॉ दीपक पाटील, डॉ विनायक राऊत, डॉ संतोष पाटील,.प्रा.डी डी थोरात, प्रा.शिवहर आंबेगावे, अनिल पाटील प्रा.विनायक माथने, प्रा.सतीश गायकवाड उपस्थित होते.

आधुनिक शेती अवजारे, लघुउद्योगांतील नावीन्यपूर्ण उत्पादने आणि सौरऊर्जा उपाययोजना यांचे सादरीकरण येथे पाहायला मिळेल. खर्च कमी करून उत्पादन वाढविणारे पर्याय, सोलर पंप-पॅनल्ससारखी तंत्रे, तसेच ग्रामीण उद्योजकतेला चालना देणारी उत्पादने यामुळे शेतकरी व नवउद्योजकांना प्रत्यक्ष माहिती व व्यवहार्य पर्याय मिळणार आहेत. महिला बचत गटांनी तयार केलेली हस्तकला, घरगुती प्रक्रिया-उत्पादने, मसाले, पापड-लोणचे यांसह विविध वस्तूंचे भव्य प्रदर्शन व विक्री येथे होणार आहे. त्याचबरोबर स्थानिक चवीचे खाद्यपदार्थ नागरिकांना चाखायला मिळणार असून दर्जेदार स्थानिक उत्पादनांना थेट बाजारपेठ मिळेल.नागरिकांनी कुटुंबासह उपस्थित राहून प्रदर्शनाला भेट द्यावी, खरेदी-विक्रीत सहभागी व्हावे आणि या लोकाभिमुख उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.